ePaper
वर्ष - 9 । अंक - 164 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 09 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ‘दहशतवादाशी कोणतीही तडजोड नाही’, पंतप्रधान मोदी





पान 2 वरुन...

महाशिवरात्री दिवशी भीमाशंकर मंदिर बंद!

### भाजपसह संघप्रणित संघटनांच्या पापात आमचाही वाटा; सरसंघचालक

# आरएसएसमुळे भाजपला ‘अच्छे दिन’

महाईन्यूज । मुंबई

**भाजप सत्तेत असल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला चांगले दिवस (अच्छे दिन) नसून संघामुळे भाजपला ‘ अच्छे दिन ’ असल्याचे परखड प्रतिपादन सरसंघचालक मोहन भागवत यांनी रविवारी येथे केले. भाजपसह संघप्रणित संघटनांनी आपल्या कार्यातून कमावलेले पुण्य त्यांचेच आहे, मात्र या संघटनांमध्ये संघातून गेलेले कार्यकर्ते असल्याने त्यांच्या पापाचा थोडा वाटा आमच्याकडे येतो व आम्ही तो स्वीकारतो, असे भागवत यांनी स्पष्ट केले.**




भागवत यांनी ‘संघ प्रवासाची १०० वर्षे, नवे क्षितीज ’, या विषयावर वरळीतील नेहरु सेंटरमध्ये शनिवार व रविवारी विस्तृतपणे उहापोह केला. संघ समजून कसा घ्यावा, संघाचा विचार, कार्यपद्धती काय, आदी मुद्द्यांवर विवेचन केले आणि भाजप-संघ संबंध यासह राजकारण, समाजकारण, जातीव्यवस्था, अनुसूचित जाती-जमातीची व्यक्ती सरसंघचालक होवू शकते का, यासह अनेक प्रश्नांना परखड उत्तरे दिली.

भाजपमुळे संघाला अच्छे दिन आहेत का, भ्रष्टाचारी व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नेत्यांना भाजपकडून प्रवेश दिला जात असताना संघ त्यांच्यावर दबाव का टाकत नाही, आदी प्रश्नांवर भागवत म्हणाले, भाजपमुळे संघाला अच्छे दिन नसून त्याच्या उलट परिस्थिती आहे, संघामुळे भाजपला अच्छे दिन आहेत. आम्ही कोणासाठीही काम करीत नसून आमची नीती, विचार व ध्येयासाठी काम करतो. आमची नीती व विचार जे स्वीकारतात, त्यांना लाभ होतो. आम्ही अयोध्येतील राममंदिराच्या बाजूने भूमिका घेतली. ज्यांनी ती नीती स्वीकारली, त्यांचा लाभ झाला. आणीबाणीला विरोध, राम जन्मभूमी आदी आंदोलने आणि संघाच्या कार्यकर्त्यांचे परिश्रम यामुळे संघटनेचा पाया वाढला व लोकांचा विश्वास मिळाला, त्यामुळे आमचे ‘अच्छे दिन ’ आले आहेत, असे भागवत यांनी स्पष्ट केले.

भाजप, विश्व हिंदू परिषद, अभाविप, मजदूर संघ, किसान संघ या संघप्रणित संघटना असून संघाचे कार्यकर्ते त्यात आहेत. ते प्रभावीही आहेत. पण त्या संघाच्या शाखा नसून या संघटना स्वायत्त, स्वतंत्र व स्वावलंबी आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र व कार्यपद्धती स्वतंत्र आहे. राजकारण सिद्धांतावर असावे आणि विचार असावा, असे संघाचे मत आहे. पण आम्ही कोणावर दबाव टाकत नाही. आम्हाला कोणी सल्ला मागितला, तर सर्वांना देतो. धोका दाखवून देतो. ज्याप्रमाणे कुटुंबातील पाच भावांचे स्वतंत्र व्यवसाय असल्यास ते कुटुंब म्हणून एकत्र असतात, पण एकमेकांच्या व्यवसायात लुडबुड करीत नाहीत, त्याप्रमाणे आमचीही कार्यपद्धती आहे. भाजपसह अन्य संस्थांनी आपल्या कार्यातून कमावलेले पुण्य त्यांचे असते, पण पापात मात्र थोडा वाटा आमचा असतो. या संघटनांमध्ये संघातून गेलेले कार्यकर्ते असल्याने पापाचा काही वाटा आमच्याकडे येतो, त्याला काही इलाज नाही. ती आमची जबाबदारी (रिस्क) आहे.

## घटनात्मक आरक्षण योग्यच

देशाच्या राज्यघटनेने दिलेले आरक्षण योग्यच असून अनेक वर्षे अत्याचार सहन केलेल्या आणि दुर्लक्षित राहिलेल्या समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे, अशीच संघाची कायम भूमिका राहिली आहे. या समाजाचे पुनरुत्थान करण्यासाठी मदत व सहकार्याची गरज असून इतरांनी थोडा त्याग केला पाहिजे. जातीपाती, धर्म विसरुन आपल्या दैनंदिन जीवनात वागले पाहिजे. जेव्हा आपण समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील झालो आहोत आणि सक्षम झालो आहोत, असे या आरक्षण मिळत असलेल्या वर्गाला वाटेल, तेव्हा आता आरक्षणाची गरज उरलेली नाही, असे त्यांच्याकडून सांगितले जाईल. तोपर्यंत काही वर्षे वाट पाहिली पाहिजे, असेही भागवत यांनी नमूद केले.

## राजकीय पक्षांचे मतांचेच राजकारण

राजकारणावर संघाचा दबाव नसतो, तो मतदारांचा असतो. घेतो. सिद्धांतहीन राजकारण चालते, म्हणून राजकीय पक्षांकडून ते केले जाते. राजकारण हे आज केवळ मतांसाठी होत असून समाजाने नैतिकता जोपासली पाहिजे. तसे झाले, तर राजकारण विचारांवर चालेल, असे भागवत यांनी नमूद केले. राजकारणात जातीपाती, धर्म आदी बाबींचा विचार केला जातो. पण मतदार किंवा समाजाकडून जातीपातीचा विचार केला जात असल्याने तो राजकीय नेत्यांकडून केला जातो. जर समाजाने जातीपातीचा विचार सोडला, तर निवडणुकीच्या राजकारणातूनही जातीपाती हद्दपार होतील, असे मत भागवत यांनी व्यक्त केले.

## स्वा. सावरकरांना ‘भारतरत्न’ दिल्यास तो पुरस्काराचा गौरव

स्वा.सावरकरांना ‘ भारतरत्न ’ दिल्यास तो पुरस्काराचा गौरव ठरेल, असे प्रतिपादन करीत भागवत यांनी सावरकरांना हा पुरस्कार देण्याच्या मागणीचे ठामपणे समर्थन केले. सावरकरांचे स्थान अतिशय वरचे आहे. हा पुरस्कार देण्यासंदर्भातील समितीमध्ये मी नाही. पण जे आहेत, त्यांना यासंदर्भातील भावना कळविल्या जातील, असे भागवत यांनी नमूद केले.

# महाशिवरात्रीला भीमाशंकर मंदिर बंद!

## भव्य सभामंडप उभारणीचे काम व परिसर विकास कामे वेगात सुरू

**महाईन्यूज । पुणे**

**नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ २०२५ मधील अनुभवाच्या आधारे नाशिक कुंभमेळा कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. साधारणत: दररोज सुमारे एक लाख भाविक येथे येण्याची शक्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र भिमांशकर विकास आराखडा (कुंभमेळा २०२७ –गर्दी व्यवस्थापन व इतर सोयी सुविधा) या विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिलेली आहे.**



### धार्मिक विधी सुरू राहणार

मंदिर भाविकांसाठी बंद असले तरी, महाशिवरात्रीनिमित्त होणारे सर्व धार्मिक विधी, पूजा आणि परंपरा मात्र खंडित होणार नाहीत. मंदिराचे पुजारी आणि मोजक्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत नियमित पूजा व महाशिवरात्रीचे विशेष विधी पार पडणार आहेत. भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि मंदिर परिसरात गर्दी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

या विकास आराखड्याअंतर्गत भाविकांसाठी सुरक्षित, सुयोग्य व सुसज्ज सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध पायाभूत कामे हाती घेण्यात आलेली असून त्यामध्ये नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग तसेच गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा विकसित करण्याची कामे सध्या प्रगतिपथावर असून कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

कुंभमेळ्याच्या वेळेस श्री क्षेत्र भिमाशंकर येथे होणाऱ्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जूना सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्यामुळे नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याबरोबरच पायरी मार्गाचे काम देखील सुरू करण्यात आलेले आहे. मुख्य सभामंडप पूर्णत: उतरविण्यात आल्यामुळे नवीन सभामंडप तयार करताना श्री भिमाशंकर येथे रोज होणारी गर्दी लक्षात घेता मंदीर दर्शनासाठी बंद केल्याशिवाय सदरील काम करणे शक्य होणार नव्हते. तसेच सदर कामांच्या अंमलबजावणीदरम्यान बांधकाम साहित्य, मोठ्या आकाराचे दगड व अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आलेली आहे. कामांचे स्वरूप, परिसरातील भौगोलिक परिस्थिती व भाविकांच्या मोठ्या संख्येचा विचार करता, बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे हे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भाविकांची सुरक्षितता अबाधित राखणे तसेच विकास आराखड्यातील कामे नियोजित कालमर्यादित पूर्ण करणे या उद्देशाने यापूर्वी मंदिर तीन महिन्यांसाठी (महाशिवरात्रीचा कालावधी वगळून) तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

पूर्वी भाविकांच्या सोयीचा विचार करून महाशिवरात्री कालावधी (दि. 12 फेब्रुवारी ते दि. 18 फेब्रुवारी 2026) वगळण्यात आला होता. तथापि, सध्या सुरू असलेल्या बांधकामाच्या कामाचा वेग, व्याप्ती व सुरक्षेच्या बाबींचा सखोल आढावा घेतल्यानंतर, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दगडी बांधकाम सुरू असल्याने तसेच दगड व बांधकाम साहित्य हलविणे शक्य नसल्यामुळे, महाशिवरात्री कालावधीत मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे अत्यंत जास्त पावसाचे प्रमाण असते. या कालावधीत बांधकाम कामे करणे शक्य नसल्याने उपलब्ध कालावधीतच कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. यामुळे विकास कामांना गती देणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून पूर्वी महाशिवरात्री कालावधीत मंदिर खुले ठेवण्याच्या निर्णयामध्ये बदल करण्यात आलेला असून, दि. १२ फेब्रुवारी ते दि. १८ फेब्रुवारी २०२६ या महाशिवरात्री कालावधीतही श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या नित्यदर्शनासाठी बंद राहणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे.

# हडपसर-लोणीकाळभोर-सासवड मार्ग प्रगतीपथावर

**महाईन्यूज । पुणे**

**शहराच्या पूर्वेकडील उपनगरीय वाहतुकीमध्ये सुलभता आणण्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात केली आहे. मेट्रो मार्गिका विस्तारीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत प्रस्तावित हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रस्ता या मेट्रो उपमार्गिकांच्या संरेखन आराखड्यासाठी (डिझाइन) सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**



### सर्वाधिक फायदा

महामेट्रोच्या या विस्तारित प्रकल्पामुळे हडपसर, फुरसुंगी, लोणी काळभोर, सासवड परिसरातील नागरिकांना मोठा फायदा होईल. सध्या या मार्गांवर होणारी वाहतूक कोंडी, प्रवासाचा वेळ आणि प्रदूषण यात लक्षणीय घट होईल. तसेच, पुढील टप्प्यात प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत जोडणी देण्याचे नियोजन असल्याने, हा भाग शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा दावा महामेट्रोकडून करण्यात आला आहे.

महामेट्रोकडून निविदा मागविण्यास सुरुवात झाली असून, ४ मार्चपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. गुणवत्ता आणि मूल्यमापनाच्या निकषानुसार पात्रता सिद्ध केल्यानंतर कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होताच ४८ महिन्यांमध्ये संरेखन आराखडा तयार करण्याचे उद्दिष्ट देण्यात येणार आहे, असे महामेट्रोकडून स्पष्ट करण्यात आले.

महामेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी मार्गिकेचा विस्तार म्हणून हे दोन उपमार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत.

केंद्र आणि राज्य सरकारकडून या दोन्ही मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार हडपसर ते लोणी काळभोर (मार्गिका क्रमांक चार-ब) हा मार्ग ११.३५ किलोमीटर लांबीचा असून, त्यात दहा उन्नत स्थानके प्रस्तावित आहेत. त्याचबरोबर हडपसर बस डेपो ते सासवड रस्ता (मार्गिका क्रमांक ४-क) हा मार्ग ५.५७ किलोमीटरचा असून, यादरम्यान चार उन्नत स्थानके आहेत. दोन्ही मिळून १४ स्थानकांसह सुमारे १७ किलोमीटरचा हा विस्तार पूर्व पुण्यापासून पश्चिम पुण्यास जोडला जाणार आहे.

या प्रकल्पासाठी ‘डिटेल्ड डिझाइन कन्सल्टन्सी’ (डीडीसी) सेवांसाठी निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये स्थानकांचे सविस्तर अभियांत्रिकी संरेखन, बांधकाम नियोजन, पूर्वानुमान आणि संबंधित तांत्रिक बाबींचा समावेश आहे. याबाबत वरिष्ठ पातळीवर नुकतीच बैठक झाली असून, सल्लागाराच्या नियुक्तीनंतर प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) आणि पुढील टप्प्यांची अंमलबजावणी वेगाने करण्याचे नियोजन असल्याचे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

# दापोडीत २०८ ग्रॅम गांजासह एकाला अटक!

## अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई; २८,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**दापोडी पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी पथकाने धडक कारवाई करत गांजाची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या एका आरोपीस अटक केली आहे. ही कारवाई दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ८.१० वाजण्याच्या सुमारास बोपोडी ते दापोडी रोडवर आदिती हॉटेलजवळ, सर्वे नं. ८०/१ येथील मोकळ्या जागेच्या भिंतीलगत करण्यात आली.**




या प्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ३४/२०२६ अन्वये एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) (II) (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे ०२.२५ वाजता आरोपीस अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव सचिन वसंत कांबळे (वय ३३ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी, रा. राजू काटे यांचे खोलीत, सरस्वती अनाथ आश्रमजवळ, अ. काटे चाळ, दापोडी, पुणे) असे आहे.

आरोपीकडून एकूण २०८ ग्रॅम वजनाचा गांजा (अंदाजे किंमत २८,४०० रुपये) तसेच २ मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा सदर अंमली पदार्थ अनाधिकृत व बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी बाळगत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

ही कारवाई पोलीस हवालदार विजय दीपक दौंडकर (बॅज नं. १९१६), अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड यांच्या पथकाने केली. पुढील तपास दापोडी पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत, अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक महानवर यांनी दिली आहे.

# दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी राज्यभर 'कॉपीमुक्त अभियान'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत (राज्य बोर्ड) फेब्रुवारी २०२६ पासून इयत्ता १० वी आणि १२ वीच्या बोर्ड परीक्षांचे आयोजन करण्यात येणार आहे. या परीक्षांदरम्यान कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी राज्य सरकारच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार राज्यभर 'कॉपीमुक्त अभियान' राबविण्यात येणार आहे.**



राज्य बोर्डाकडून मिळालेल्या माहितीनुसार, इयत्ता १२ वीची परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ पासून, तर इयत्ता १० वीची परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत इयत्ता १० वीची परीक्षा ७३ केंद्रांवर, तर इयत्ता १२ वीची परीक्षा ४२ केंद्रांवर होणार आहे. परीक्षा शांततेत, कॉपीमुक्त आणि निकोप वातावरणात पार पडाव्यात, यासाठी पोलीस प्रशासनाने कडक उपाययोजना केल्या आहेत.

परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्ती व वाहनांना प्रवेशास बंदी घालण्यात आली आहे. तसेच परीक्षा कालावधीत सार्वजनिक टेलिफोन, झेरॉक्स केंद्रे, सायबर कॅफे, फॅक्स केंद्रे, एसटीडी बूथ, ध्वनीक्षेपक व तत्सम दूरसंचार साधने बंद ठेवण्यात येणार आहेत.

परीक्षा केंद्रांमध्ये मोबाईल फोन, ब्लूटूथ उपकरणे, पेजर, इंटरनेटवर आधारित प्रसार माध्यमे किंवा कोणतीही इलेक्ट्रॉनिक साधने वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश २४ जानेवारी २०२६ रोजी जारी केला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अंतर्गत कारवाई केली जाणार आहे.

परीक्षा केंद्रांवर पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत असतील. याशिवाय ड्रोन कॅमेऱ्यांच्या माध्यमातून परीक्षा केंद्रांवर नजर ठेवली जाणार असून, आवश्यकतेनुसार व्हिडिओ चित्रीकरणही केले जाणार आहे.

इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षांमध्ये कॉपीला प्रवृत्त करणारे, मदत करणारे किंवा प्रत्यक्ष गैरमार्गाचा अवलंब करणारे आढळल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र कॉपी प्रतिबंधक कायदा १९८२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

परीक्षा काळात विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



## भूमिका

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहनराव भागवत यांनी देशातील भाषाविषयक दारिद्र्याची दखल घेतली, हे निश्चितच स्वागतार्ह आहे. "भारतीयांना भारतीय भाषाच येत नाहीत" हे त्यांचे विधान आजच्या वास्तवावर नेमके बोट ठेवणारे आहे. संघ मुख्यालय नागपूर येथे ज्ञानेश्वरीच्या इंग्रजी आवृत्तीच्या प्रकाशनप्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले भाषाचिंतन महत्त्वाचे ठरते.**

# भारतीय भाषांचे दारिद्र्य आणि आपले वास्तव

ज्ञानेश्वरीचा इंग्रजी अनुवाद काहींना अनाठायी वाटू शकतो, मात्र आज अनेक मराठी भाषकांनाही मूळ ज्ञानेश्वरी समजणे कठीण जाते, हे वास्तव नाकारता येत नाही.

मुळात ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची रचना केली कारण त्या काळात संस्कृतमधील गीतेचा अर्थ सर्वसामान्यांना कळत नव्हता. म्हणूनच त्यांनी हा ग्रंथ प्राकृत मराठीत लिहिला. पुढे एकोणिसाव्या शतकात बाळशास्त्री जांभेकर यांनी ज्ञानेश्वरीच्या पुनरुज्जीवनात मोलाचे योगदान दिले. 'दर्पण'च्या माध्यमातून मराठी पत्रकारितेचा पाया घालणारे जांभेकर हे बहुभाषाकोविद होते. ग्रीकपासून संस्कृतपर्यंत अनेक भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. इंग्लंडचा इतिहास मराठीत आणण्याची जबाबदारी ईस्ट इंडिया कंपनीने त्यांच्याकडे सोपवली होती, यावरून त्यांच्या विद्वत्तेचा अंदाज येतो. मराठी समाजाला ज्ञानेश्वरीचा नव्याने शोध लागण्यासाठी जांभेकरांसारख्या विद्वानांची गरज भासली, हेही एक वास्तव आहे.

आज मराठी भाषकांनाही ज्ञानेश्वरीची भाषा अवघड वाटते. त्यामुळे तिचा इंग्रजी अनुवाद नव्या पिढीसाठी उपयुक्त ठरू शकतो. संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देण्यासाठी मराठीत लिहिलेला हा ग्रंथ, आज मराठीच्या मक्तेदारीलाही प्रश्न विचारतो. यावरून आपली भाषिक घसरण किती वेगाने होत आहे, हे स्पष्ट होते.

मात्र संस्कृतविषयी सरसंघचालकांनी व्यक्त केलेले काही मतप्रदर्शन शंकास्पद वाटते. "एके काळी भारतात सर्व व्यवहार संस्कृतमध्ये होत" हे विधान ऐतिहासिकदृष्ट्या तपासण्यासारखे आहे. सम्राट अशोकाच्या काळात पाली भाषा प्रचलित होती. सातवाहन, वाकाटक, चालुक्य, यादव यांच्या काळात प्राकृत, अर्धमागधी, कन्नड, मराठी अशा विविध भाषा व्यवहारात होत्या. यादवांच्या काळात मराठीला विशेष बळ मिळाले. कालिदासाच्या साहित्यात संस्कृत संवाद आढळतो, मात्र त्यावरून सर्वसामान्य लोक संस्कृतात व्यवहार करत होते असा निष्कर्ष धोकादायक ठरेल. महाराष्ट्रातील संतपरंपरेत एकाही संताने संस्कृतात लेखन केलेले नाही. दक्षिणेतील तामिळ भाषा तर संस्कृतपेक्षाही जुनी आहे.



परदेशी तज्ज्ञ भारतात येऊन भारतीय भाषा शिकवतात, याबद्दल सरसंघचालकांनी व्यक्त केलेली खंत रास्त आहे. मात्र त्यामागे आपल्या समाजाने ज्ञान आणि ज्ञानी यांची केलेली उपेक्षा कारणीभूत आहे. रा. चिं. ढेरे यांसारख्या विद्वानांच्या ग्रंथसंपदेची उपेक्षा झाली, हे त्याचे जिवंत उदाहरण आहे. मिरजेतील ग. ह. खरे वाचन मंदिर किंवा राजवाडे संस्थेतील हस्तलिखितांची अवस्था याहून वेगळी नाही.

शेवटी हिंदी सक्तीचा मुद्दा अधिकच महत्त्वाचा ठरतो. "भारतीयांना भारतीय भाषा येत नाहीत" हे विधान जर गांभीर्याने स्वीकारले, तर अहिंदी प्रदेशांमध्ये स्थानिक आणि मातृभाषा अधिक सक्षम करण्यावर प्राधान्य दिले पाहिजे. महाराष्ट्रात मराठी भाषा सक्षम करण्यासाठी शिक्षण, प्रशासन आणि दैनंदिन व्यवहारांत तिचा वापर वाढवणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत मराठी दुर्बल असतानाच हिंदी लादणे योग्य ठरणार नाही. उलट स्थानिक भाषांच्या संवर्धनावर भर दिल्यास भाषिक समृद्धी साधता येईल. या अर्थाने सरसंघचालकांचे भाषाविषयक चिंतन दखलपात्र असून ते स्वागतार्हही ठरते.

## प्रासंगिक »

### घुबड आणि टोळाची गोष्ट

***एक म्हातारे घुबड झाडाच्या ढोलीत शांतपणे झोपले होते. दुपारची वेळ असल्याने ते विश्रांती घेत होते. तेवढ्यात एका टोळाने झाडाखाली येऊन मोठ्या आवाजात गाणे म्हणायला सुरुवात केली.***

त्याच्या सततच्या किरकिर आवाजामुळे घुबडाची झोप मोडली. घुबडाने टोळाला नम्रपणे विनंती केली की, इथून थोडे दूर जावे आणि विनाकारण त्रास देऊ नये. मात्र टोळाला ही विनंती अजिबात आवडली नाही. त्याने उलट घुबडाची थट्टा सुरू केली व त्याला चोर, लबाड अशी अपशब्द बोलू लागला. घुबडाने त्याला समज देण्याचा प्रयत्न केला आणि इशारा दिला, तरीही टोळ ऐकून घेईना. शेवटी घुबडाने युक्तीचा वापर केला. त्याने टोळाची खोटी स्तुती करत त्याचे गाणे खूप गोड असल्याचे सांगितले व अमृत देतो असे बोलून त्याला जवळ बोलावले. तहानलेला टोळ अमृतासाठी पुढे येताच घुबडाने संधी साधून त्याला पकडून खाऊन टाकले.

तात्पर्य – आपल्याला जे आवडते ते इतरांनाही आवडेल असे नसते. दुसऱ्यांच्या भावना व आवडीचा विचार न केल्यास शेवटी स्वतःचाच नाश होतो.

दीर्घकाळ चर्चेत असलेला आणि प्रलंबित राहिलेला भारत–अमेरिका व्यापार करार अखेर सोमवार, २ फेब्रुवारी रोजी घोषित झाला. या कराराला 'विन-विन ट्रेड डील' असे संबोधले जात असून, त्यामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक तणाव कमी होऊन

# भारत-अमेरिका ट्रेड: मिथक-वास्तव

संबंधांना नवे वळण मिळाले आहे. हा करार केवळ व्यापारापुरता मर्यादित न राहता राजकीय, सामरिक आणि भू-राजनैतिक दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे.

रशियाकडून कच्च्या तेलाची आयात केल्याच्या कारणावरून अमेरिकेने भारतावर यापूर्वी टेरिफ आणि दंडात्मक कर लादले होते. मात्र भारताने युरोप, आशिया व आफ्रिकेतील अनेक देशांशी मुक्त व्यापार करार करत आपला आर्थिक व्याप वाढवला. भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे स्पष्ट होताच अमेरिकेने आपली कठोर भूमिका सैल केली. अमेरिकेतच भारतविरोधी धोरणांवर टीका वाढत होती, विशेषतः लोकशाही मूल्यांच्या आधारावर भारताशी मैत्री टिकवणे आवश्यक असल्याचा सूर उमटत होता.

या पार्श्वभूमीवर अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय उत्पादनांवरील टेरिफ ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत



कमी करण्याचा निर्णय घेतला. तसेच यापूर्वी लादलेले परस्पर कर आणि रशियाकडून तेल खरेदीवरील अतिरिक्त दंडात्मक करही मागे घेण्यात आले. या निर्णयामुळे भारतीय उद्योगजगत आणि शेअर बाजाराला मोठा दिलासा मिळाला असून, अर्थव्यवस्थेतील मंदी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भारतानेही अमेरिकन वस्तूंवरील कर आणि नॉन-टेरिफ अडथळे टप्प्याटप्प्याने कमी करण्याची तयारी दर्शवली आहे. मात्र देशांतर्गत शेतकरी, दुग्धव्यवसाय आणि अन्नसुरक्षेचे हित जपले जाईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. ऊर्जा क्षेत्रात भारताने अमेरिके आणि व्हेनेझुएलाकडून तेल आयातीचे पर्याय खुले करत रशियावरचे अवलंबित्व काही अंशी कमी केले आहे. ही भूमिका तात्पुरती तडजोड असली तरी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे.

अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा निर्यात भागीदार असल्याने या कराराचा फायदा वस्त्रोद्योग, रत्ने व दागिने, औषधनिर्मिती, अभियांत्रिकी वस्तू, अन्नउत्पादने आणि आयटी क्षेत्राला होणार आहे. याशिवाय गुगल, मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉनसारख्या अमेरिकी तंत्रज्ञान कंपन्यांच्या भारतातील गुंतवणुकीला चालना मिळेल. डेटा सेंटर्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल सेवा क्षेत्रात नवी संधी निर्माण होईल.

एकूणच, दोन्ही देशांच्या आर्थिक गरजांमधून साकारलेला हा व्यापार करार समतोल राखणारा असून, 'विन-विन ट्रेड डील' ही संज्ञा या कराराच्या वास्तवाशी सुसंगत ठरते.

## ।। अभंगवाणी ।।



सावित्री सुलोचना अनुसया गाथा।
धर्मपंथ दीपती चारी ॥१॥

नाम घेतां त्यांचें निर्मळ मन।
शुद्ध होई जीवन भावें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# टीईटी परीक्षेत मंगळसूत्रावरून वाद

## दानवेंचा सरकारवर हल्लाबोल; फडणवीस म्हणाले, “चौकशी करू”

**महाईन्यूज** | छत्रपती संभाजीनगर

**राज्यभरात रविवारी शिक्षक पात्रता परीक्षा होत होती. यानिमित्ताने राज्यभरातील हजारो उमेदवार परीक्षा केंद्रावर पोहोचले होते. मात्र, छत्रपती संभाजीनगरमध्ये काही महिला उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागला. परीक्षा केंद्रातील नियम म्हणून त्यांना त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि इतर दागिने काढून ठेवण्यास सांगण्यात आले. यावरून गोंधळ निर्माण झाला. विधान परिषदेचे आमदार अंबादास दानवे यांनी याविरोधात आवाज उठवला असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रकरणी प्रतिक्रिया दिली.**



### परीक्षा केंद्रातील नियम काय सांगतो?

दरम्यान, परीक्षेवेळी परीक्षा केंद्रांवर मेटल डिटेक्टरने तपासणी केली जाते. यामध्ये धातूची दागिने, उदा. मंगळसूत्र, चेन, कानातले, अंगठ्या अशी आभूषणे काढून ठेवण्यास सांगितले जातात. परंतु, या नियमाची माहिती नसल्याने परीक्षा केंद्रांवर गेल्यावर सोन्याचे दागिने कुठे काढून ठेवायचे हा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे परीक्षा केंद्रावर जाताना कधीच किमती वस्तू किंवा दागिने परिधान करून जाऊ नये, असं आवाहन केलं जातं.

### सरकारी दडपशाही

शिक्षक पात्रता परिक्षेसाठी गेलेल्या महिला उमेदवारांच्या गळ्यातील मंगळसूत्रासहित सर्व दागिने काढून ठेवण्यास सांगण्यात आले. यावरून अंबादास दानवे म्हणाले, “विचित्र विरोधाभास! ‘हिंदुत्व’ आणि ‘संस्कृती’च्या गप्पा मारणाऱ्यांच्या राज्यात महिलांना मंगळसूत्र काढून परीक्षेला बसावं लागतंय. ११ वर्षांच्या सत्तेनंतरही प्रशासनाला ‘मंगळसूत्र’ आणि ‘कॉपी’ मधला फरक कळत नाही बहुदा. ही आपली संस्कृती की सरकारी दडपशाही? ही परीक्षा हिंदुस्थानात सुरु आहे, पाकिस्तानात नाही.” असा संताप अंबादास दानवे यांनी व्यक्त केला.

### चौकशीचे आदेश दिले जातील

याप्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही विचारण्यात आलं. ते म्हणाले, “यासंदर्भात मागच्या काळातही तक्रारी आल्या होत्या. यासंदर्भात मी माहिती घेईन. मागच्या वेळी असा विषय झाला होता तेव्हा परीक्षेचं आयोजन करणाऱ्यांनी सांगितलं होतं की असे अनुभव आले की वेगवेगळ्या गोष्टींमध्ये साहित्य लपवले जाते. त्यातून चिटींग केली जाते. तथापी अशा पद्धतीने मंगळसूत्र काढून घेणं योग्य नाही. परंतु, याची आधी काळजी घेणं गरजेचं आहे. याबाबत सूचना दिल्या जातील आणि याची चौकशी केली जाईल.”

## लालपरीच्या ताफ्यात आता ‘राजमाता जिजाऊ’ बस!

**महाईन्यूज** | मुंबई

**राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या ताफ्यात लवकरच नव्या बस दाखल होणार आहेत. गर्दीच्या मार्गावर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसला राजमाता जिजाऊ यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.**




मंत्री सरनाईक म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब आहेत. या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसचे राजमाता जिजाऊ असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसगाड्यांना गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सध्याच्या बसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गावर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होईल. त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गावर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

या नवीन बस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहेत. भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे चालते-बोलते प्रतीक ठरतील, असा विश्वास एसटी महामंडळाने व्यक्त केला.

राजमाता जिजाऊ हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# दहशतवादाशी कोणतीही तडजोड नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मलेशियातून ठणकावलं

महाईन्यूज । मलेशिया

**पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात अनेक महत्वाच्या करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. तसेच पंतप्रधान मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली आहे. पंतप्रधान मोदींचं मलेशियात जंगी स्वागत करण्यात आलं. यावर बोलताना 'मलेशियातील स्वागत भारत कायम लक्षात ठेवेल', असं म्हणत मोदींनी मलेशियाचे आभार मानले.**



### पंतप्रधान मोदींनी काय म्हटलं?

'भारताला आज जगात विकासासाठी विश्वासार्ह भागीदार म्हणून पाहिले जाते. याचा प्रत्यय ब्रिटन, अमेरिका, युरोपीय महासंघासह अनेक देशांबरोबर भारताने केलेल्या व्यापार करारांतून येतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी मलेशियामध्ये केले. क्वालालंपूर येथे झालेल्या एका सामुदायिक कार्यक्रमात बोलताना मोदी म्हणाले की, भारतीय वंशाचे लोक भारत आणि मलेशिया यांच्यातील मैत्रीचा मजबूत दुवा आहेत.

पंतप्रधान मोदींनी मलेशियात बोलताना दहशतवादावर मोठं भाष्य करत पाकिस्तानला अप्रत्यक्ष संदेश दिला. 'दहशतवादाबाबत भारताची भूमिका ठाम आहे, दहशतवादाबाबत भारताचा संदेश अगदी स्पष्ट आहे. दहशतवादाशी कोणतीही तडजोड होणार नाही', असं म्हणत मोदींनी दहशतवादाचा मुकाबला करण्याबाबत भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला.

दरम्यान, भारत आणि मलेशियामधील धोरणात्मक विश्वास हा आर्थिक परिवर्तनाचा मार्ग आहे, यावर भर देत पंतप्रधान मोदींनी रविवारी दहशतवादाबाबत भारताची भूमिका दृढ आणि तडजोड न करता कायम असल्याची स्पष्ट केलं. शांततेच्या उद्देशाने केलेल्या सर्व प्रयत्नांना भारताचा पाठिंबा अधोरेखित करत शांततेसाठीच्या सर्व प्रयत्नांना भारताचा कायम पाठिंबा असेल असंही मोदींनी स्पष्ट केलं.

'दहशतवादाबाबत भारताची भूमिका ठाम असून आमचा संदेश स्पष्ट आहे. दहशतवादाबाबत कोणतेही दुहेरी निकष नाही किंवा कोणतीही तडजोड नाही', असं मोदींनी मलेशियात बोलताना म्हटलं. दरम्यान, "एआय आणि डिजिटल तंत्रज्ञानाबरोबरच आम्ही सेमीकंडक्टर्स, आरोग्य आणि अन्न सुरक्षेमध्ये भारत आणि मलेशियामधील सहकार्य आणखी वाढवण्याचा प्रयत्न करत आहोत", असं मोदींनी सांगितलं आहे.

यावेळी मोदींनी ब्रिटन, संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ओमान, युरोपीय महासंघ आणि अमेरिका यांच्याशी झालेल्या करारांचा उल्लेख केला. भारत आणि मलेशिया एकमेकांना चांगले ओळखतात, कारण भारतीय भाषांमध्ये आणि मलय भाषेत अनेक सारखे शब्द आहेत, असेही मोदी म्हणाले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, २०२६ मधील हा त्यांचा पहिला परदेश दौरा असून मलेशियात येऊन आपल्याला खूप आनंद होत आहे. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम हे पंतप्रधान होण्यापूर्वीपासूनच आपले मित्र असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मलेशियातील तमिळ समाज विविध क्षेत्रांत समाजसेवा करत आहे. 'तमिळ समाज येथे अनेक शतकांपासून आहे. या समृद्ध इतिहासामुळेच आम्ही मलेया विद्यापीठात तिरुवल्लुवर चेअर स्थापन केली. आता सामायिक वारसा अधिक मजबूत करण्यासाठी तिरुवल्लुवर केंद्रही उभारणार आहोत,' असे त्यांनी सांगितले.

# रशियाच्या वैद्यकीय विद्यापीठात चाकू हल्ला; चार भारतीय विद्यार्थी जखमी

महाईन्यूज । रशिया

**रशियाच्या बाशकोर्तोस्तान प्रजासत्ताकातील एका विद्यापीठातील परदेशी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात शनिवारी चाकू हल्ला झाला. या चाकू हल्ल्यात चार भारतीय विद्यार्थ्यांसह अनेक जण जखमी झाले, अशी माहिती मॉस्कोमधील भारतीय दूतावासाने दिली.**



स्थानिक माध्यमांच्या प्राथमिक वृत्तानुसार, हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करताना दोन पोलिस अधिकारीही जखमी झाले. बाशकोर्तोस्तानची राजधानी उफा येथील स्टेट मेडिकल युनिव्हर्सिटीच्या वसतिगृहात हा हल्ला झाला. रशियाच्या गृह मंत्रालयाने सांगितले की, प्राथमिक माहितीनुसार, चाकू घेऊन सज्ज असलेल्या एका १५ वर्षीय मुलाने वैद्यकीय विद्यापीठाच्या वसतिगृहात प्रवेश केला आणि तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर हल्ला केला, ज्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले.

प्रत्यक्षदर्शींनी वसतिगृहातील दहशतीचे दृश्य वर्णन केले. रशियन माध्यमांनी साक्षीदारांच्या हवाल्याने सांगितले की हल्ल्यानंतर सर्वत्र रक्ताचे डाग पसरले होते. स्थानिक माध्यमांनी प्रसारित केलेल्या व्हिडिओ फुटेजमध्ये आपत्कालीन कर्मचारी जखमींना रुग्णवाहिकांमधून रुग्णालयात नेत असल्याचे दिसून आले.

रशियन अधिकाऱ्यांनी अद्याप संभाव्य हेतू किंवा संशयिताचा पीडितांशी पूर्वी काही संबंध होता का हे उघड केलेले नाही. रशियन अधिकाऱ्यांशी संबंध असलेल्या बाझा चॅनेलने दावा केला आहे की हल्लेखोर बंदी घातलेल्या नव-नाझी संघटनेचा होता.

### आरोपीने स्वतःलाही शारीरिक इजा केली

"हल्ल्याखोराने अटकेचा प्रतिकार केला, त्यादरम्यान दोन पोलिस अधिकाऱ्यांना चाकूने वार करण्यात आले. शिवाय, संशयिताने स्वतःलाही शारीरिक इजा केली", असे गृह मंत्रालयाच्या प्रवक्त्या मेजर जनरल इरिना वोल्क यांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी सांगितले की संशयिताला ताब्यात घेण्यात आले आहे. पीडितांना आणि हल्लेखोराला किती दुखापत झाली आहे हे लगेच कळू शकले नाही. तपास समितीने घटनेची चौकशी सुरू केली आहे.

### रशियाशी राजदूत संपर्क

घटनेनंतरचे दृश्य दाखवणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे, त्यात पोलिस अधिकारी आरोपीला बर्फाच्या जाड थरांमधून बाहेर काढताना दिसत आहेत. याला "दुर्दैवी घटना" असे संबोधत मॉस्कोमधील भारतीय दूतावासाने म्हटले आहे की, "चार भारतीय विद्यार्थ्यांसह अनेक लोक जखमी झाले आहेत." अधिकारी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत आणि रशियन अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत.



## मृणाल ठाकूरने अहिराणी भाषेत साधला संवाद

अभिनेत्री मृणाल ठाकूरने बॉलीवूड आणि साऊथ इंडस्ट्रीमध्ये काम करीत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. पण मूळची मराठी असलेली मृणाल ठाकूर अहिराणी भाषा बोलताना पाहायला मिळाली आहे. सध्या तिचा व्हिडिओ सोशल मिडियावर तुफान व्हायरल होत आहे. मृणाल आणि सिद्धांत चतुर्वेदी यांचा 'दो दिवाने सहर मै' सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या सिनेमाच्या एका कार्यक्रमासाठी आलेल्या एका रिपोर्टरने मृणालशी अहिराणी भाषेत संवाद साधला. यावेळी रिपोर्टरने अहिराणी भाषेत अभिनेत्रीशी संवाद साधत "तुले सर्वात जास्त काय आवडस? वांग्यानं भरीत, बट्टी गोटी, वांग्यानं भाजी की शेव भाजी?" असं विचारलं. यावर मृणालने हसत-हसत उत्तर दिले, "काय बोली रायनी. अडीच वाजीगयना, जेवायना शे मले." मग रिपोर्टरने तिला 'काय खायला आवडेल', असं विचारलं. त्यावर मृणाल म्हणाली, "वांग्यानं भरीत पहिले. वरण, एखादं बट्ट जोडे." पुढे मृणालने त्या रिपोर्टरला विचारलं, "वरण बट्टी लायेल शे ना तू?" मग ती रिपोर्टर म्हणते, "मी आता आणलं नाहीय; पण तू माझ्याबरोबर चल मी तुला खायला देते". त्यावर मृणाल म्हणते, "चल, येस मी... वरण बट्टी, तूप आणि लिंबूशिवाय नाही होणार हां..." मृणालने तिच्या अहिराणी भाषेतल्या उत्तराने सर्वांनाच चकीत केले. ती अहिराणी बोलत असताना सिद्धांत देखील आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पाहत होता. दरम्यान, 'दो दिवाने सहर मै' या सिनेमात मृणाल ठाकूर आणि सिद्धांत चतुर्वेदी यांची जोडी पाहायला मिळणार आहे.



## अनीत-विशाल करणार ऑनस्क्रीन रोमान्स

होमबाउंड' या चित्रपटातील अभिनयाने लक्ष वेधून घेतल्यानंतर, अभिनेता विशाल जेठवा आता एका नव्या आणि रंजक प्रोजेक्टसाठी सज्ज झाला आहे. एका मीडिया रिपोर्टनुसार, विशाल जेठवा आता 'मॅडॉक फिल्म्स'च्या आगामी हॉरर-कॉमेडी चित्रपटात 'सैयारा' फेम अभिनेत्री अनीत पड्डा हिच्यासोबत स्क्रीन शेअर करतांना दिसणार आहे. या चित्रपटात विशाल आणि अनीत यांचा रोमँटिक अंदाज प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचे शूटिंग पुढील महिन्यात सुरू होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जरी मीडिया रिपोर्ट्सद्वारे ही माहिती समोर आली असली, तरी अद्याप निर्मात्यांकडून या प्रोजेक्टची अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही.

## सीरतने शिक्षणाला दिले प्राधान्य

अभिनेत्री सीरत कपूर सध्या घरवाली पेडवाली या मालिकेत सावीची भूमिका साकारत प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. ॲण्ड टीव्हीवरील ही हॉरर कॉमेडी मालिका आता अत्यंत रोमांचक व निर्णायक टप्प्यात प्रवेश करत आहे. मंदिरातील विधी, धक्कादायक रहस्ये तसेच जीतू आणि लतिका यांच्याशी संबंधित अलौकिक शक्तीचे ट्विस्ट्स यांमुळे पांडे कुटुंबातील ड्रामा अधिक गडद होताना दिसणार आहे. याबाबत सीरत कपूर म्हणाली की, सावी आणि माझ्यात खूप साम्य आहे. ती भावुक, संवेदनशील आणि आतून खंबीर आहे. हे गुण माझ्यातही आहेत. सावीची भूमिका साकारताना गोंधळ, प्रेम, असुरक्षितता आणि स्थैर्य अशा भावना प्रत्यक्ष आयुष्यात जगत असल्यासारख्या वाटतात. सर्जनशील कुटुंबातून येऊनही शिक्षणाला प्राधान्य देत तिने अभिनयाचा प्रवास घडवला. सह-कलाकार प्रियमवदा कांत आणि पारस अरोरा यांच्याशी सेटवरील नातेही अतिशय जिव्हाळ्याचे असल्याचे नमूद करताना सीरत म्हणाली की, शूटिंगदरम्यान आणि पॅक-अपनंतरही आम्ही खूप धमाल करतो. यामुळे आमची ऑनस्क्रीन केमिस्ट्री अधिक नैसर्गिक दिसते.



## मानसिक संघर्षावर मन्नाराचे भाष्य

तिचे जीवन बहुतेकदा आरामदायी कसे मानले जाते यावर विचार करताना, अभिनेत्री मन्नारा म्हणाली की, लोक तिच्या दररोज होणाऱ्या मानसिक संघर्षाकडे क्वचितच लक्ष देतात. मन्नाराने सांगितले की, ती राजकारणाने भरलेल्या जगात सभ्य राहण्यावर, शॉर्टकटपेक्षा सन्मान आणि अनावश्यक आवाजापेक्षा शांत राहण्यावर विश्वास ठेवते. इन्स्टाग्रामवर, मन्नाराने जिममध्ये घाम गाळताना, चक्रासन, कोर वर्कआऊट्स, वेटेड स्क्वेट्स आणि बर्षी करतानाचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. कॅप्शनसाठी, मनाराने लिहिलेः मऊ हृदय. मजबूत पाठीचा कणा. लोकांना वाटते की, माझे जीवन म्हणजे आराम आहे. त्यांना मी दररोज लढत असलेली मानसिक लढाई दिसत नाही. ती म्हणाली की, आव्हाने तिला क्षणभर तोडू शकतात; पण तिचा उत्साह कधीच वाकवत नाहीत. आणि माझ्या स्वतःच्या लढाया कृपेने लढत आहे. मी अशीच आहे. दुसऱ्या बातमीत, डिसेंबरमध्ये अभिनेत्रीने सदाहरित ख्रिसमस क्लासिक 'लास्ट क्रिसमस'ला तिचा आवाज दिला होता. गेल्या ख्रिसमसला मी तुला माझे हृदय दिले... पण या खिसमसला, मी तुला आणखी वैयक्तिक काहीतरी देत आहे- माझा आवाज, असे तिने कॅप्शन म्हणून लिहिले. तिने ४० हून अधिक जाहिरातींमध्ये काम केले आहे. अभिनय पदार्पणापूर्वी तिने फॅशन डिझायनर आणि सहाय्यक कोरिओग्राफर म्हणून काम केले होते. हिप हॉप आणि बेली डान्सिंगसारख्या नृत्य प्रकारांमध्ये प्रशिक्षण घेतले होते. मन्नाराने २०१४ मध्ये अभिनयाच्या जगात पाऊल ठेवले आणि तेलुगू, तमिळ, हिंदी आणि कन्नड भाषांतील चित्रपटांमध्ये तिने काम केले आहे.



# कर्णधार सूर्यादादाने इतिहास घडवला!

## टी-२० इतिहासात अशी कामगिरी करणारा भारताचा पहिलाच खेळाडू

**महाईन्यूज । मुंबई**

**भारताने अमेरिकेवर विजय मिळवत टी-२० विश्वचषक २०२६ ची सुरुवात विजयाने केली आहे. अमेरिका संघावरचा हा विजय भारतासाठी सहज नव्हता. टीम इंडियाला मोठा संघर्ष करत हा विजय मिळवावा लागला. भारताच्या या विजयाचा हिरो ठरला कर्णधार सूर्यकुमार यादव. सूर्याने या सामन्यात नाबाद ८६ धावांची खेळी करत टीम इंडियाला मोठी धावसंख्या गाठून दिली. यासह सूर्यकुमार यादवने टी-२० इतिहासात मोठा पराक्रम केला आहे.**



नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताची सुरुवात निराशाजनक झाली. पॉवरप्लेमध्ये त्यांनी चार विकेट गमावल्या, ज्यामुळे संघ अडचणीत आला. सलामी जोडी आणि मधल्या फळीतील फलंदाज एकामागोमाग एक बाद झाले. भारताने ७७ धावांवर ६ विकेट्स गमावल्या होत्या. टीम इंडिया संकटात असताना अमेरिकेच्या भेदक गोलंदाजीसमोर सूर्या एकटाच उभा ठाकला आणि त्याने अर्धशतकी खेळी केली.

कर्णधार सूर्यकुमार यादवने अशा कठीण स्थितीत एका टोकापासून संघाचा डाव उचलून धरला. सूर्याने प्रसंगी सावध तर संधी मिळताच आक्रमक फटके खेळले. सूर्यकुमारने फक्त ३७ चेंडूत ७ चौकार व एका षटकारासह आपलं अर्धशतक पूर्ण केलं. तर त्याने या सामन्यात ४९ चेंडूत १० चौकार व ४ षटकारांसह ८६ धावांची खेळी केली. यासह त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला.

टी-२० इतिहासात आता सर्वाधिक वेळेस सामनावीराचा पुरस्कार पटकावणारा सूर्यकुमार यादव हा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने विराट कोहलीला मागे टाकत सर्वाधिक सामनावीर पुरस्कार जिंकण्याचा विक्रम आपल्या नावे केला आहे. सूर्याने १०५ टी-२० सामन्यांमध्ये १७ सामनावीर पुरस्कार मिळवले आहेत.

टी-२० विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक सामनावीर पुरस्कार मिळवण्यात भारतीय खेळाडूंच्या यादीत सूर्यकुमार यादव दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर विराट कोहली सर्वाधिक सामन्यांसह पहिल्या स्थानी आहे. तर या यादीमध्ये भारताचे युवराज सिंग, रविचंद्रन अश्विन व रोहित शर्मा असे इतर खेळाडू आहेत.

### सामनावीर पुरस्कारांचे भारतीय दिग्गज



१७ – सूर्यकुमार यादव – १०५ सामने
१६ – विराट कोहली – १२५ सामने
१४ – रोहित शर्मा – १५९ सामने
८ – अक्षर पटेल – ८८ सामने

### टी-२० विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक सामनावीर पुरस्कार जिंकणारे भारतीय खेळाडू

८ – विराट कोहली – ३५ सामने
४ – सूर्यकुमार यादव – १९ सामने
३ – युवराज सिंग – ३१ सामने
३- आर अश्विन – २४ सामने
३ – रोहित शर्मा – ४७ सामने

# नेपाळचं चमत्काराचं स्वप्न भंगलं; इंग्लंडचा चार धावांनी विजय

**महाईन्यूज । मुंबई**

**शेवटच्या षटकात १० धावा करण्याचं आव्हान नेपाळसमोर होतं. लोकेश बाम विरुद्ध सॅम करन अशा लढाईत अनुभवी सॅम करनने बाजी मारली. अटीतटीच्या लढतीत इंग्लंडने अवघ्या ४ धावांनी विजय मिळवला. लोकेश बामने २० चेंडूत ३९ धावांची झुंजार खेळी केली. इंग्लंडने दिलेल्या १८४ धावांचा पाठलाग करताना नेपाळचा संघ विजयाच्या उंबरठ्यावर होता. सॅम करनने सगळा अनुभव पणाला लावत शेवटच्या षटकात चौकार किंवा षटकार जाऊ दिला नाही.**




नेपाळने आसिफ शेखला झटपट गमावलं. त्यानंतर कुशल भुर्टेल आणि रोहित पौडेल यांनी वेगवान भागीदारी केली. भुर्टेल १७ चेंडूत २९ धावांची खेळी करून बाद झाला. यानंतर रोहितला देवेंद्र सिंग एरीची साथ मिळाली. ३४ चेंडूत ३९ धावांची खेळी करून रोहित बाद झाला. देवेंद्रने सूत्रं हाती घेतली. २९ धावांत ६ चौकार आणि एका षटकारांसह ४४ धावांची खेळी केली. धावगतीचं आव्हान वाढत असताना लोकेश बामने चौकार, षटकारांची पखरण करत सामना नेपाळच्या बाजूने फिरवला. जोफ्रा आर्चरच्या चौथ्या षटकात नेपाळने २२ धावा चोपून काढल्या.

प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने जेकब बेथेल आणि कर्णधार हॅरी ब्रूक यांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर १८४ धावांची मजल मारली. भरवशाचा अनुभवी जोस बटलर २६ धावा करून तंबूत परतला. फिल सॉल्ट झटपट बाद झाला. टॉम बॅन्टनचा रिव्हर्स स्वीप करण्याचा प्रयत्न अंगलट आला. ब्रूक आणि बेथेल यांनी चांगली भागीदारी केली. बेथेलने ३५ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांसह ५५ धावांची खेळी केली.

बेथेल बाद झाल्यानंतर ब्रूकने सूत्रं हाती घेतली. नेपाळने नियमित अंतरात विकेट्स घेतल्या. विल जॅक्सने १८ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारासह नाबाद ३९ धावांची खेळी केली. ब्रूकने ३२ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५३ धावांची खेळी केली. नेपाळतर्फे दिपेंद्र सिंग एरी आणि नंदन यादव यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. १८ चेंडूत ३९ धावांची खेळी करणाऱ्या विल जॅक्सला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार।

दि. 09 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# स्थायी समितीसाठी नगरसेवकांची भाऊगर्दी!

## २० फेब्रुवारीला १६ सदस्यांची निवड; अध्यक्षपदासाठी भाजपच्या दिग्गजांत स्पर्धा

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत सलग दुसऱ्यांदा भाजपाची सत्ता आली आहे. एकूण 128 नगरसेवक संख्या असलेल्या महापालिकेत बहुतांश नगरसेवक स्थायी समिती सदस्य पदासाठी इच्छुक आहेत. तर, अनुभवी व दिग्गज नगरसेवक समिती अध्यक्षपदासाठी आग्रही आहेत. त्यामुळे कोणाला संधी मिळते, याची उत्सुकता वाढली आहे. समितीच्या 16 सदस्यांची निवड 20 फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेत होणार आहे.**



महापालिकेचे महापौरपदी रवी लांडगे, उपमहापौरपदी शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची निवड शुक्रवारच्या (दि. 6) विशेष सभेत झाली आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहून ती सभा 20 फेब्रुवारी दुपारी एकपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. त्या सभेत स्थायी समिती सदस्यांची निवड केली जाणार आहे. त्यात सत्तारूढ पक्षनेते शितोळे, विरोधी पक्षनेते भोईर आणि शिवसेनेचे गटनेते विश्वजित बारणे हे समितीच्या सदस्यासाठी आपल्या पक्षांच्या नगरसेवकांच्या नावाची यादी महापौरांकडे सादर करतील. त्यानंतर काही दिवसात स्थायी समिती सभेत अध्यक्षपदाची निवड केली जाईल. ती निवड विभागीय आयुक्त कार्यालयाने नेमलेल्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

नगरसेवक संख्येनुसार स्थायी समितीमध्ये सत्ताधारी भाजपाचे 11, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) 4 आणि शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) 1 सदस्य असणार आहे. साहजिकच समितीचा अध्यक्ष भाजपाचा असणार आहे.

महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या या स्थायी समितीकडे असतात. महापालिकेचे प्रत्येक विकासकाम, प्रकल्प, योजना, उपक्रम, दौरे, कामे, पुरवठा व इतर कामांना ही समितीच मंजुरी देते. त्यानंतरच त्या संबंधित ठेकेदार किंवा पुरवठादारांला वर्क ऑर्डर दिली जाते. त्यानंतरच त्या बिलाची रक्कमेची तरतूद केली जाते. समितीकडून ग्रीन सिग्नल मिळाल्याशिवाय महापालिकेचे कोणतेही काम पुढे सरकत नाही. त्यामुळे या समितीला महापालिकेच्या कारभारामध्ये सर्वाधिक महत्व आहे.



### स्थायीच्या अध्यक्षपदी शत्रुघ्न काटे की शीतल शिंदे?

स्थायी समितीच्या अध्यक्षपदासाठी अनेक जण इच्छुक आहे. ते पद चिंचवड, भोसरी की पिंपरी विधानसभा मतदार संघाकडे जाते, त्यावरून नगरसेवकांचे नाव निश्चित होणार आहे. पक्षाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे व तिसऱ्यांदा निवडून आलेले शीतल शिंदे हे महापौरपदासाठी तीव्र इच्छुक होते. हे पद न मिळाल्याने ते नाराज आता, स्थायी समिती अध्यक्षपदासाठी आडून बसल्याची चर्चा आहे. तसेच, माजी गटनेते राहुल कलाटे, माजी विरोधी पक्षनेते राजू मिसाळ, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नितीन लांडगे, नगरसेवक हर्षल ढोरे, माजी उपमहापौर तुषार हिंगे हेही अध्यक्षपदासाठी इच्छुक आहेत.

### ...तर स्थायी समिती अध्यक्षांकडे आयुक्त सादर करतील अर्थसंकल्प

स्थायी समितीचे गठण होऊन, समिती अध्यक्षांची निवड झाल्यास महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर अध्यक्षांकडे महापालिकेचा सन 2027-28 चा अर्थसंकल्प सादर करतील. 28 फेब्रुवारीपर्यंत स्थायी समितीच्या अध्यक्षांची नेमणूक करणे गरजेचे आहे. 20 फेब्रुवारीला स्थायी समितीच्या सदस्यांची निवड झाल्यानंतर लगेच सोमवार (दि. 23) ते ते गुरुवार (दि. 26) या कालवाधीत अध्यक्षांची निवड होईल. शुक्रवार (दि. 27) किंवा शनिवार (दि. 28) आयुक्तांकडून अर्थसंकल्प स्थायी समितीसमोर सादर केला जाईल.

### विभागीय आयुक्त प्रतिनिधीच्या अध्यक्षतेखाली अध्यक्षांची निवड

महापौरांनी शुक्रवारची (दि. 6) विशेष सभा 20 फेब्रुवारी दुपारी एकपर्यंत तहकूब केली आहे. त्या सभेत स्थायी समितीच्या 16 सदस्यांची निवड केली जाऊ शकते. त्यानंतर पुणे विभागीय आयुक्तांची वेळ घेऊन, निश्चित केलेल्या दिवशी तिसऱ्या मजल्यावरील मधुकरराव पवळे सभागृहात 16 सदस्यांमधून एकाची अध्यक्षपदी निवड केली जाईल. त्यानंतर दर मंगळवारी स्थायी समितीची साप्ताहिक सभा होईल, असे महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

### नाराजांची विषय समितीवर वर्णी

स्थायी समिती अध्यक्ष तसेच, सदस्यपद न मिळाल्याने पक्षात विशेषत: सत्तारूढ भाजपात नाराजी वाढणार आहे. नाराजी दूर करण्यासाठी पक्षनेत्यांना कसरत करावी लागणार आहे. त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला जाईल. नाराज नगरसेवकांची वर्णी शिक्षण, क्रीडा, विधी, शहर सुधारणा, महिला व बालकल्याण या विषय समिती सभापती व सदस्यपदी केली जाऊ शकते. त्या दृष्टीने पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभेतील नगरसेवकांची नावे काढली जात आहेत. कोणाला कोणती समिती द्यायची, याचे आराखडे तयार केले जात आहेत. गटातून विषय समितीचेही वाटप केले जाते.

# चांगल्या संस्कारातूनच नवी पिढी घडेल

## कवी प्रभाकर चव्हाण यांना विनोबा भावे जीवनगौरव पुरस्कार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मुलांना अधिकाधिक चांगले संस्कार कसे देता येतील, हे पहायला हवे. त्यातूनच नवी पिढी घडेल, असा विश्वास महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी येथे व्यक्त केला.**



‘राजमाता अहिल्यादेवी शिक्षण संस्थे’च्या वतीने चिखलीतील ‘टाऊन हॉल’ येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कवी, योगशिक्षक व ‘शब्दब्रम्ह विविधांगी सेवा संस्थे’चे संस्थापक-अध्यक्ष प्रभाकर चव्हाण यांना ‘आचार्य विनोबा भावे जीवनगौरव पुरस्कार’, योगिराज सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तापकीर यांना ‘यशवंतराव चव्हाण सहकारभूषण पुरस्कार’, तर वैशाली सावळेकर यांना ‘आदर्श पालक पुरस्कार’ सदाफुले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी नगरसेवक यश साने, विकास साने, नगरसेविका संगीता ताम्हाणे, सोनम मोरे, संस्थेचे अध्यक्ष व्यंकटेश वाघमोडे, गजानन वाघमोडे, मोहन देवकाते, शंकर जाधव आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना सदाफुले म्हणाले, की मुलांना चांगले संस्कार दिले पाहिजेत. आजची स्थिती पाहता शिक्षकांवरील जबाबदारी वाढली आहे. मुलांना मुक्तपणे खेळू द्या. बागडू द्या. त्यांच्या कलागुणांना वाव द्या.

यश साने म्हणाले, की मुलांना मोबाईलपासून दूर ठेवले पाहिजे. मोबाईलचे किती दुष्परिणाम आहेत, हे आपण एक सर्व जण पाहत आहोत. त्यामुळे याबाबत पालकांनी काळजी घेतली पाहिजे.

विकास साने म्हणाले, आज संस्कार महत्त्वाचे आहेत. म्हणूनच पालकांनी योग्य वयात मुलांवर योग्य ते संस्कार करण्यावर भर दिला पाहिजे. त्यातूनच मुले घडतील.

प्रभाकर चव्हाण म्हणाले, 'हा घरचा पुरस्कार आहे. वाढती स्पर्धा, नोकरीधंदा, ताणतणाव यामुळे बऱ्याचदा पालकांचे आपल्या मुलांकडे दुर्लक्ष होते. मात्र, मुलांना वेळ दिला पाहिजे. त्यासाठी वेळेचे व्यवस्थापन केले पाहिजे. योग्य संस्कारच मुलांना चांगला नागरिक बनवू शकतात.

रंजना आव्हाड यांनी सूत्रसंचालन केले. सई पांचाळ यांनी परिचय करून दिला. तर सत्यवान वाघमोडे यांनी आभार मानले.

# मोरया हॉस्पिटलमागे मामनचंद आगरवालांचे योगदान : डॉ. वाचासुंदर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**“मोरया हॉस्पिटलच्या उभारणीत मामनचंद आगरवाल यांचे योगदान इतके मूलभूत आहे की, ते नसते तर आज मोरया हॉस्पिटलची इमारत उभी राहिलीच नसती,” असे ठाम आणि भावनिक विधान मोरया हॉस्पिटलचे कार्यकारी विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर यांनी केले. मामनचंद आगरवाल यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त निगडी प्राधिकरण येथील त्यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**



भारतीय जनता पक्षाचे माजी शहराध्यक्ष, पिंपरी-चिंचवडचे माजी नगरसेवक, सद्गुरु जंगली महाराज बँकेचे संस्थापक अध्यक्ष तसेच नामवंत उद्योजक असलेल्या मामनचंद आगरवाल यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त कोणतेही धार्मिक कर्मकांड व विधी टाळून सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. त्यांच्या प्रगतिशील विचारांनुसार मोरया हॉस्पिटलला आर्थिक मदत देत सेवा आणि माणुसकीच्या माध्यमातून त्यांना आगळीवेगळी आदरांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमास मोरया हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अरविंद पंडित, कार्यकारी विश्वस्त डॉ. अविनाश वाचासुंदर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रकाश बोराडे, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. मुकुंद डोग्गीकर, पॅथॉलॉजिस्ट डॉ. ज्योती कोराडे, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. नीलिमा अमृते, आयुर्वेद विभागप्रमुख डॉ. वेंकटेश धर्माधिकारी, आयुर्वेदाचार्य डॉ. उदय जोशी, ओरल सर्जन डॉ. अमित नेमाने उपस्थित होते. यासह सामाजिक कार्यकर्ते संजय कुलकर्णी, कामगार प्रतिनिधी व विश्वस्त भगवान तांबे तसेच मोरया हॉस्पिटलच्या व्यवस्थापिका सारिका मोरे यांचीही उपस्थिती होती.

यावेळी अध्यात्मिक गुरु सूरजभान, तसेच मामनचंद आगरवाल यांच्या पत्नी गंगादेवी एम. आगरवाल, भाऊ चंद्रभान सी. आगरवाल (गर्ग), भावजय निर्मला चंद्रभान आगरवाल गर्ग, लता रामकुमार आगरवाल, पुत्र सुरेश मामनचंद आगरवाल, राजेश मामनचंद आगरवाल, कन्या उषा मोहन गुप्ता, पुष्पा जितेंद्र आगरवाल, मीना सोमेश गुप्ता यांच्यासह संपूर्ण आगरवाल परिवार उपस्थित होता.

डॉ. अविनाश वाचासुंदर पुढे म्हणाले, “१९८२ पासून मामनचंद आगरवाल यांचा मोरया हॉस्पिटलशी अतूट संबंध होता. आम्ही सर्व डॉक्टर सेवाभावी वृत्तीने काम करत होतो, या एकाच विश्वासावर त्यांनी जंगली महाराज बँकेच्या माध्यमातून हॉस्पिटलसाठी कर्ज उपलब्ध करून दिले. कोणताही मान-सन्मान किंवा पदाची अपेक्षा न ठेवता त्यांनी संस्थेच्या प्रत्येक टप्प्यावर आम्हाला आधार दिला.”

मामनचंद आगरवाल यांचे कार्य केवळ सामाजिक व आरोग्य क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते. ते सत्संग भवन जिंदराम गुरु का रहानी आश्रमाचे संस्थापकही होते. या आश्रमाच्या माध्यमातून अध्यात्म, सद्विचार आणि जीवनमूल्यांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आपले तन, मन आणि धन अर्पण केले. समाजातील सर्वसामान्य माणसाला सत्संगाचे महत्त्व समजावे, आत्मचिंतनाची जाणीव निर्माण व्हावी यासाठी ते आयुष्यभर प्रयत्नशील राहिले.

कार्यक्रमात मोरया हॉस्पिटलच्या डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला आणि हॉस्पिटलसाठी आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी अध्यात्मिक गुरु सूरजभान यांच्या मार्गदर्शनाखाली भजन व सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक आणि आर्थिक क्षेत्रात ठसा उमटवणारे मामनचंद आगरवाल हे केवळ यशस्वी उद्योजक नव्हते, तर विचारांनी आणि कृतीने समाज घडवणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या जीवनकार्याचा वारसा पुढे नेणारा हा प्रथम स्मृतीदिन कार्यक्रम उपस्थितांच्या मनाला भावून गेला.

मोरया हॉस्पिटलच्या उभारणीस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्रीपती शास्त्री व ज्येष्ठ प्रचारक तात्या बापट यांच्याकडून प्रेरणा मिळाल्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला. त्यांच्या विचारांनी सेवाभावी रुग्णालय उभारण्याचा संकल्प अधिक बळकट झाल्याचे उपस्थितांनी सांगितले.

मामनचंद आगरवाल यांचे विचार अत्यंत प्रगतिशील होते. कर्मकांड व अंधश्रद्धांना त्यांनी कधीही थारा दिला नाही. आयुष्यभर अंधश्रद्धांविरोधात काम करत त्यांनी माणुसकी, विवेक आणि समाजहित यांना सर्वोच्च स्थान दिले. त्यामुळेच प्रथम स्मृतीदिनानिमित्त कोणतेही धार्मिक विधी न करता सामाजिक उपक्रम राबवण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला.


Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm Your Application Now!
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046